जा.क्र.आस्था/ब–४/३७१/२०२४
जिल्हा न्यायालय, सोलापूर
दि. ०१/०४/२०२४

# जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर

फोन–०२१७–२६२७०७७ ई–मेल– mahshodc@mhstate.nic.in

---

**ई–सेवा केंद्र, जिल्हा न्यायालय, सोलापूर येथे कंत्राटी कर्मचारी नेमणुकीबाबत.**

---

मा. केंद्रीय प्रकल्प समन्वयक, उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक २८ मार्च, २०२४ रोजीचे या कार्यालयास ई–मेलव्दारे प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने ई–सेवा केंद्र, जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर येथे मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या मार्गदर्शक सूचनामधील पृष्ठ क्र. १० वरील "e-Sewa Kendra Manpower Needs" या शिर्षकांखालील परिच्छेद क्र. ८ मध्ये अ.क्र. ८.२ मध्ये "PLV/Contractual staff for manning counters depending upon the number of conters" असे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने एक कंत्राटी कर्मचारी नेमण्यात येणार असून पात्र उमेदवारांनी सदर पदाकरीता जिल्हा न्यायालय, सोलापूर या आस्थापनेच्या खाली नमुद करण्यात आलेल्या कार्यालयीन पत्यावर दिनांक <u>०२.०४.२०२४ ते दिनांक ०६.०४.२०२४ रोजी सायं. ५.००</u> पर्यंत प्रत्यक्ष किंवा टपालाव्दारे अर्ज सादर करावेत. त्यानंतर या कार्यालयाकडे सादर होणारे विनंती अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जाच्या छाननी अंती अर्जदारांना मुलाखतीस बोलावण्यात येईल आणि मुलाखतीनंतर उमेदवाराच्या निवडीचा सर्वस्वी हक्क निवड समितीचा राहील. उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे आणि त्यावेळी त्यांनी त्यांचे सर्व मुळ कागदपत्रे व त्यांचे साक्षांकीत प्रती सोबत आणावेत.

| १. कंत्राटी कर्मचारी पद भरतीच्या अनुषंगाने उमेदवारांची खालील प्रमाणे पात्रता आवश्यक आहे. | |
|---|---|
| पात्रता | १.कोणत्याही मान्यतापात्र विद्यापीठातून पदवी घेतलेली असणे आवश्यक आहे.<br><br>२.सरकारी व्यावसायिक प्रमाणपत्र परिक्षा किंवा सरकारी मंडळाद्वारे घेतलेली परिक्षा किंवा संगणक टंकलेखन बेसिक कोर्स यामध्ये सरकारी प्रमाणपत्र ( GCC –TBC किंवा ITI ) यामध्ये इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा त्याहून अधिक गती आणि मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. किंवा त्याहून अधिक गतीची परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र असावे.<br><br>३. खालीलपैकी कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेतून MS-Office, MS-Word, Word Star-7 आणि Open-Office org. या व्यतिरिक्त Windows आणि Linux मध्ये Word Processor चालवण्यामध्ये प्राविण्याबद्दल संगणक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>अ. NIC, DOEACC, APTECH, NIIT, C-DAC, DATAPRO, SSI, BOSTON, CEDIT, M. S. CIT.<br><br>**(अनुभवी उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल)**<br><br>सदर पदाकरिता कागदपत्रांची पडताळणी करुन, मुलाखतीद्वारे नियुक्ती करण्यात येईल. |
| वयोमर्यादा | वय वर्षे १८ ते ४३ |
| मानधन | १५,०००/— मासिक |
| अर्ज सादर करावयाचा कार्यालयीन पत्ता | मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब,<br>जिल्हा न्यायालय, सोलापूर,<br>सिव्हील लाईन्स, डॉ. वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालय समोर, रंगभवन, सोलापूर. |

त्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या मार्गदर्शक सूचनामधील पृष्ठ क्र. ६ यातील परिच्छेद क्र. ५ मध्ये नमुद करण्यात आलेले "FACILITIES TO BE PROVIDED IN E-SEWA KENDRA" हे खालीलप्रमाणे आहेत.

eSK shall initially roll out following services for Litigants and needy Lawyers –

5.1 Handling inquiries about case status, next date of hearing and other details.

5.2 Facilitate online Applications for certificate copies and other such filing.

5.3 Facilitate eFiling of petitions right from scanning of hardcopy petitions, appending, eSignatures, uploading them into CIS and generation of filing number.

5.4 To assist in online purchase of eStamp papers/ePayments.

5.5 To help in apply and obtain Aadhaar based digital signature.

5.6 Publicize and assist in downloading the Mobile App of eCourts for Android and IOS.

5.7 Facilitate in booking of eMulakat appointment for meeting relatives locked in Jail.

5.8 Handlings queries about Judges on Leave.

5.9 Handling queries about location of the particular Court, its cause-list and whether the case is taken up for hearing or not.

5.10 Guide people on how to avail free legal services from District Legal Service Authority, High Court Legal Service Committee and Supreme Court Legal Service Committee.

5.11 Facilitate disposal of traffic challan in virtual Courts as also online compounding of traffic challans and other petty offences.

5.12 All other queries and assistance in respect of facilities which are digitally available under eCourt Project.

5.13 Explain method of arranging and holding a video conference court hearing.

5.14 Provide soft copy of judicial orders/judgments via email. WhatsApp or any other availabel mode.

It is submitted that we can add and modify the above services in eSewa Kendra as per local needs and inputs from users.

सबब, इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी जिल्हा न्यायालय, सोलापूर येथील ई–सेवा केंद्राकरीता कंत्राटी कर्मचारी या पदाकरीता निर्धारीत वेळेत अर्ज कार्यालयीन पत्यावर सादर करावेत.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आज सोमवार दिनांक ०१.०४.२०२४ रोजी कार्यालय प्रमुख यांच्या स्वाक्षरीनीशी व कार्यालयाच्या मुद्रेनिशी जिल्हा न्यायालय, सोलापूर या कार्यालयाच्या संगणकीय संकेतस्थळावर जाहीर प्रसिध्द करण्यात आले.

दिनांक – ०१/०४/२०२४

(मो. सलमान आझमी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सोलापूर.

DISTRICT COURT OF SHOLAPUR
सत्यमेव जयते
डिस्ट्रिक्ट कोर्ट सोलापूर